## नियमित दिवाणी दावा क्र. ५६/२०१३ मधील निशाणी क्र.११४ वरील आदेश

प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला व वादींचे साक्षीदारांचा उलटतपासणी घेण्याची परवानगी मिळणेची विनंती केली व त्यांचे साक्षीदारांना न्यायालयात हजर होणे बाबत आदेश करणेची विनंती केली.

०२. प्रतिवादी पुढे असे कथन करतो की, त्यांनी वेळेत कैफियत दाखल केले नाही. वादी व साक्षीदार यांची साक्ष पूर्ण झालेली आहे. त्यामुळे, त्यांच्यामार्फत उलटतपास घेण्यात आलेला नाही. त्यामुळे, त्यांनी वादी व साक्षीदार यांचा उलटतपास घेणेकामी व उचित न्यायासाठी त्यांना हजर करणे आवश्यक आहे असे कथन केले आहे.

०३. वादी यांनी त्यांचे म्हणणे सदर अर्जावर नोंदविले व त्यांनी अर्जास सक्त हरकत घेतले. वादीचे साक्षीदारांचे सरतपास व उलटतपासाचे कामकाजावेळी प्रतिवादी जाणून–बुजून गैरहजर होते. तसेच, प्रतिवादीने प्रस्तुत प्रकरणात जाणुन–बुजून उशीरा कैफियत दाखल केले, प्रतिवादी यांचा हेतू विलंब करणे हा असल्याचे दिसून येते. असे म्हणून त्यांनी प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

०४. उभय पक्षकारांतर्फे करण्यात आलेला युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचे अर्ज व प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचे प्रकरणामध्ये वादी यांचे साक्षीदार क्र.१ व २ यांचा सरतपास नोंदविण्यात आला आहे. सदर साक्षीदाराचा उलटतपास कोणत्याही प्रतिवादी यांचे कडून नोंदविण्यात आलेला नाही.

०५. वादी लक्ष्मण दगडू बैकर यांचे वय दावा दाखल करीत असतांना ७७ वर्ष

होते. प्रस्तुतचा दावा २०१३ साली दाखल करण्यात आला होता. सदर वादी साक्षीदार हे वयस्कर असून त्यांना बोलतांना अडखळतात व अंथरुनावर खिळून असल्याचे वादी यांचे विधिज्ञांनी त्यांचे युक्तीवादा नमुद केले. तसेच त्यांनी कमिशनर नियुक्त करुन वादी यांचा उलटतपास नोंदवावा असे सुचित केले. वादी यांना चालता येत नाही व ते जागेवर बसून असतात असे नमुद केले. वादी यांचा उलटतपास प्रस्तुत दाव्यात महत्वाचा आहे असे नमुद करुन त्यांचा पुरावा नोंदविणे कामी कमिशनर म्हणून वकीलांची नियुक्ती करण्याची विनंती केली.

०६. प्रस्तुत अर्जा कामी वादी यांचा उलटतपासाची संधी प्रतिवादी यांना देणे हे नैसर्गिक न्यायतत्वानुसार आवश्यक आहे. प्रस्तुत अर्जाचा विचार करता, वादी यांचे साक्षीदारांना न्यायालयात हजर राहणेचा आदेश केल्याचे दिसून येते. परंतु वादी हे वसस्कर असल्याचे व अंथरुणावर झोपून असल्याचे निदर्शनास येते. त्यांचे वयाचा विचार करता निश्चितच सदरची बाब निदर्शनास येते. त्यामुळे वादी यांचे वकिलांनी कमिशनर नियुक्त होवून उलटतपास नोंदविण्याची विनंती केले.

०७. दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २६ कलम १ मधील तरतुदीनुसार कमिशनर नियुक्त करुन साक्षीदाराचा पुरावा नोंदवू शकतो. आदेश २६ मधील नियम १ मधील तरतूदी नुसार न्यायालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये एखादया व्यक्तीचा पुरावा तपासणे करीता कमीशनरची नियुक्ती करणे जेथे आवश्यक आहे त्या ठिकाणी कमीशनर म्हणून नियुक्ती करणेचे आदेशीत करता येईल.

०८. प्रस्तुत अर्जात वादी साक्षीदार हे एका जागेवर अथरुनावर झोपून असल्याचे कथन केले आहे. या बाबींचा विचार करता साक्षीदारास न्यायालयात आणणे निश्चितच व्यवहार्य नाही व त्या करीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ मधील तरतुदींचा विचार करता कमीशनर नेमणे न्यायोचित ठरते. म्हणून खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतात.

## आदेश

०१ दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम १ अन्वये साक्षीदार लक्ष्मण दगडू बैकर रा. ठाणाले, ता. सुधागड यांचा तोंडी पुरावा नोंदविणे कामी ॲड. एस. जी. पाटील यांची कमीशनर म्हणून नियुक्ती करण्यात येते.

०२ ॲड. एस. जी. पाटील वीर यांना पुरावा नोंदविणे कामी सहाय करणे साठी श्री. गणेश सुरेश कनोजे, (क. लिपीक) यांची नियुक्त करण्यात येते.

०३ प्रतिवादी यांनी प्रस्तुत कमीशन नियुक्त करणे कामी कमीशनर फी म्हणून रुपये २४००/– व त्यांचे सहायक यांची फि रुपये ८००/– त्यांना अदा करावेत अथवा न्यायालयात जमा करावेत.

०४ नोंदविलेला तोंडी पुरावा नोंदवून न्यायालयात दाखल करावे.

०५ प्रतिवादी यांनी कमिशनर व त्यांचे सहायक यांना वादी यांचा पुरावा नोंदविणे कामी वादी यांचे राहणेची ठिकाणी नेणे आणणेची व्यवस्था करावी.

०६ कमिशनर यांनी वादी साक्षीदारचे वय पाहता त्वरीत, तात्काळ त्यांचा उलटतपास नोंदविणे कामी तारीख निश्चित करावी व दोन्ही पक्षांना कळवावे.

**(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)**

SHIVRATRI RAJU ASHOK
Digitally signed by SHIVRATRI RAJU ASHOK
Date: 2024.06.18 17:55:01 +0530

दिनांकः–१८.०६.२०२४ **(रा.अ.शिवरात्री)**
पाली दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पाली